# दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई.

मुख्य कार्यालय- 'पं.दीनदयाळ भवन', परळी रोड, अंबाजोगाई जि.बीड. दूरध्वनी-०२४४६-२४६९२६, २७, २८, २९

-----------------------------------------------३० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना.-----------------------------------------------

सन्माननीय सभासद बंधू व भगिनी,

'दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई' या बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा **दिनांक १६-०८-२०२६, रविवार रोजी सकाळी ११.०० वा., कृषी विज्ञान केंद्र, डिघोळअंबा,अंबाजोगाई येथे आयोजित करण्यात आलेली आहे.** तरी सर्व सभासदांनी सदर सभेस आवर्जून उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

**विषय पत्रिका**

❖ **बँकेच्या सभासदांना सायबर सेक्युरिटी संदर्भात जाणीव जागृती करणे.**

१. मागील सभा दिनांक २४.०८.२०२५ रोजी संपन्न झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. मा. संचालक मंडळाने तयार केलेला ३० वा वार्षिक अहवाल वाचून त्यास मान्यता देणे.
३. दिनांक ३१.०३.२०२६ अखेरच्या लेखापरिक्षित ताळेबंदास व सन २०२५-२६ चे नफा-तोटा पत्रकास मंजूरी देणे.
४. सन २०२५-२६ या वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या अंदाजपत्रकापेक्षा प्रत्यक्षात कमी/जास्त झालेल्या उत्पन्न व खर्चास मान्यता देणे.
५. सन २०२६-२७ साठी शिफारस केलेल्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
६. मा. संचालक मंडळाच्या शिफारशी प्रमाणे सन २०२५-२६ सालातील नफा विभागणीस मान्यता देणे.
७. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाचे वाचन करुन नोंद घेणे.
८. सन २०२६-२०२७ सालासाठी मा.संचालक मंडळाने सतत समावर्ती लेखापरीक्षकांच्या नेमणूकीसाठी केलेल्या शिफारशीस मंजूरी देणे व मेहनताना ठरविणे.
९. सन २०२६-२०२७ सालासाठी मा.संचालक मंडळाने वैधानिक लेखापरिक्षकाच्या नियुक्तीसाठी केलेल्या शिफारशीची नोंद घेवून मान्यता देणे.
१०. मा.संचालक मंडळ सदस्य किंवा नातेवाईकास दिलेल्या कर्जासंबंधी मा.संचालक मंडळाच्या घोषणापत्राची नोंद घेणे.
११. सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षातील रु.३.०० लाखावरील भांडवली खर्चास मान्यता देणे.
१२. एकमुस्त कर्ज भरणा तडजोड योजनेस अनुसरुन सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात अनुत्पादित कर्जखाते तडजोडीने एकमुस्त रक्कम भरणा करुन बेबाकी करीत असतांना व्याजात दिलेल्या सुटीस मान्यता देणे.
१३. १०० टक्के तरतुद असलेल्या बुडीत व संशयीत कर्जखात्यांचा वसुलीचा हक्क अबाधित ठेवून खाते निर्लेखित करण्यास मंजूरी देणे.
१४. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील अदा न झालेल्या लाभांषाची रक्कम राखीव निधीस वर्ग करण्यास मंजूरी देणे.
१५. बँकेच्या उपविधीमधील दुरुस्तीस मंजूरी देणे.
१६. भारतीय रिझर्व बँकेच्या दिनांक २५ जून २०२१ रोजीच्या परिपत्रकातील अ.क्र.७.४ या नियमास अनुसरुन मुख्य कार्यकारी अधिकारी नियुक्ती संदर्भात माहिती सादर करणे.
१७. कायदा कलम २६ (२) (अ) च्या परंतुकान्वये बँकेच्या ३० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहू न शकलेल्या सभासदांची रजा मान्य करुन सभासदांना क्षमापित करणे.
१८. मा.अध्यक्षांचे अनुमतीने ऐनवेळीच्या विषयांवर चर्चा करणे.

मा.संचालक मंडळाच्या वतीने,
महेश उत्तमराव शेळके
मुख्य कार्यकारी अधिकारी

स्थळ:- अंबाजोगाई
दिनांक : ०१/०८/२०२६

**सभासदांना नम्र सुचना.**

१. गणपुर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास सदर सभेचे कामकाज उपरोक्त वेळेनंतर अर्ध्या तासाने सकाळी ११.३० वाजता सुरु होईल, त्यावेळी गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२. वार्षिक सर्वसाधारण सभेत होणा-या विषयासंबंधी काही सुचना/प्रश्न असल्यास मुख्यालयात किंवा बँकेच्या ई-मेलवर दिनांक ०८/०८/२०२६ पूर्वी कामकाजाच्या वेळेत दाखल करावेत. (प्रश्नकर्त्याने आपण स्वत: थकबाकीदार अथवा थकबाकीदारांचे जामिनदार नाही, तसेच शेअर्सची किमान रक्कम पूर्ण भरलेली आहे याची खात्री करुन घ्यावी.)

**सभासदांसाठी विनम्र माहिती:**

बँकेने या वर्षीची बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा निसर्गरम्य व प्रशस्त अशा कृषी विज्ञान केंद्र, डिघोळअंबा येथे आयोजित केलेली आहे. शेतकऱ्यांना शेतीविषयक आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण व मार्गदर्शन, जैविक खते आणि गोबर गॅस बाबत प्रात्यक्षिक व माहिती, तसेच शेतीपूरक व्यवसायासाठी सखोल मार्गदर्शन व प्रशिक्षण देणारे हे एक प्रमुख कृषी विज्ञान केंद्र आहे. आपल्या शेतकरी सभासदांना याची माहिती व्हावी व त्यांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने वार्षिक सभेसाठी हे स्थळ निवडले आहे.

सभासदांना सभेच्या ठिकाणी हजर राहण्यासाठी हे ठिकाण थोडेसे दूर असल्याने सभासदांची गैरसोय होवू नये, याची खबरदारी घेण्यात आलेली आहे. बँकेच्या परळी रोड येथील मुख्य कार्यालयापासुन सभासदांना सभेच्या ठिकाणी जाणे-येणे यासाठी बँकेने वाहनाची व्यवस्था केलेली आहे.

तरी सभासदांनी वेळेत सभा संपन्न होण्याच्या अनुषंगाने वेळेपूर्वी किमान अर्धा तास आधी मुख्य कार्यालयाच्या ठिकाणी हजर रहावे, हि नम्र विनंती.

बँकेची वेबसाईट- https://deendayal.bank.in बँकेचा ई-मेल पत्ता- hradmin@deendayal.bank.in/